॥ राजाच्या रंगमहाली ॥

गायिकाः लता आणि उषा मंगेशकर
संगीतः आनंदघन
चित्रपटः साधी माणसं

राजाच्या रंगमहाली सोन्याचा बाई पलंग
रुप्याचं खांब त्येला मोत्याची झालर ।
राजाच्या रंगमहाली पराची मऊ गादी
जरीचा चांदवा रेशमी शिणगार
गडनी सजणी गडनी सजणी गं ॥ धृ. ॥

राजाच्या रंगमहाली राणी ती रुसली
बोलं ना हासं ना उदास नजर ।
राजाच्या रंगमहाली राजानं पुसिलं
डोळ्यांची कमळं उघडा व्हटाची डाळिंब ॥ २ ॥

राजाच्या रंगमहाली राणी वो सांगते
सोना सोन्याहुनं न्हालं कशाला बडिवार?
मायेच्या पूतापायी राणी गं रडिते
आसवांची गंगा व्हाते भिजिला पदर ॥ ३ ॥